माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१५८३ / २४ /अ.क्र.४५७७ /२५

श्री. महेश माटल
शेड नं.१, रुम नं. ३, बाजूला भागीरथी निवास,
सी टी एस.न. ६९८/अे-१, रामचंद्र लेण, रोड नं. २,
मालाड प.मुंबई-४०००६४.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलन, पी/उत्तर विभाग कार्यालय इमारत, लिबर्टी गार्डन समोर,मामलेदारवाडी, मालाड (प), मुंबई ४०० ०६४.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त करनिर्धारक व संकलन खाते पी/उत्तर विभाग कार्यालय इमारत, लिबर्टी गार्डन समोर,मामलेदारवाडी, मालाड (प), मुंबई ४०० ०६४.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०६.२०१६ | २५.०७.२०२३ | ३१.०७.२०२३ | २५.१०.२०२३ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी एकूण चार प्रथम अपील आदेशांवर द्वितीय अपील अर्ज दाखल केल्याचे आढळून येते. त्यातील दिनांक ०५/०५/२०२३, २५/१०/२०२३, २६/०६/२०२३, २५/०७/२०२४ यात प्रथम अपिलिय आदेशाविरुद्ध प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केल्याचे आढळून येते.

यातील अपिलार्थींना हव्या असलेल्या मालमत्ता संदर्भात तसेच त्यातील करनिर्धारण, झालेला फेरफार हा ज्या कागदपत्रांच्या आधारे झालेला आहे त्याची माहिती अपेक्षित असून अपिलार्थींनी विविध प्राधिकरणांकडे या आधीच सी.टी.एस. नंबर ६९९ या संदर्भात अनेक अर्ज दाखल केलेले आढळून येतात.

तथापि, त्यांना अपेक्षित असणारी मुख्य माहिती म्हणजे त्यांच्या वडिलोपार्जित मालमत्तेतील झालेला फेरफार हा नेमका कुठल्या कागदपत्रांच्या आधारे झाला त्या कागदपत्रांची प्रत त्यांना अपेक्षित असून उपरोक्त माहिती ही दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील जन माहिती अधिकारी तसेच अपिलिय अधिकाऱ्यांच्या अभिलेखात उपलब्ध नसून वरील बाबी भूमी अभिलेख, नगर भूमापन या कार्यालयांमध्ये असणे अपेक्षित असून

jyotsna

अपिलार्थींनी दाखल केलेला प्रस्तुत **जोडपत्र अ** हा आहे या टप्प्यावरून संबंधित नगर भूमापन अथवा भूमी अभिलेख कार्यालयातील योग्य त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे **पुढील सात दिवसात** विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी हस्तांतरित करावा.

हा माहिती अधिकार अर्ज नगर भूमापन/भूमी अभिलेख येथील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त झाल्यानंतर **त्यापुढील दहा दिवसाचे दहा कामकाजाचे दिवसाचे आत** कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थींना **विनामूल्य** प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०१-२०२६**

State Information Commission Maharashtra

jyotsna